|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

**Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon**

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

उमवि नगर, जळगाव-४२५००१ फोन: ०२५७-२२५७२७६, २२५७२७७फॅक्स: ०२५७-२२५८४०३, ४०६,

Umavinagar, Jalgaon Tel Nos. : 0257-2257276 to 2257277, Fax Nos.:0257-2258403, 406

Web : www.nmu.ac.in E-mail : registrar@nmu.ac.in & dr-approval@nmu.ac.in

जा.क्र. कबचौउमवि/१८/१३४६/२०२४ महत्वाचे दिनांक: ०५/१२/२०२४

प्रति,
मा. प्राचार्य,
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत
सर्व अनुदानित कला, विज्ञान, वाणिज्य, विधी, शिक्षणशास्त्र,समाजकार्य महाविद्यालय
जळगाव, धुळे आणि नंदूरबार

विषय -उन्नत अभिवृद्धी योजनेतंर्गत (CAS) Academic Level 10 to 11 and Academic Level 11 to 12 मध्ये जाण्यासाठी दरवर्षी आयोजित होणाऱ्या शिबिराच्या वार्षिक आयोजनाबाबत.

---

सन २०२५ या वर्षासाठी आयोजक महाविद्यालय म्हणून सहमती पाठविणे बाबत.

महोदय,

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्न सर्व अनुदानित कला, विज्ञान, वाणिज्य, विधी, शिक्षणशास्त्र, समाजकार्य महाविद्यालयातील उन्नत अभिवृद्धी योजनेतर्गत (CAS) पदोन्नतीसाठी स्टेज एक मधून स्टेज दोन मध्ये व स्टेज तीन मध्ये (Academic Level १० ते ११ आणि ११ ते १२) जाण्याकरीता पात्र अध्यापकांच्या प्रस्तावांची छाननी तथा मूल्यमापनासाठी जळगाव,धुळे आणि नंदूरबार जिल्हानिहाय शिबिर वर्षातून दोन वेळेस आयोजित केले जाते.

तथापि, सदरहू शिबीर वर्षातून तीन वेळेस अर्थात चार महिन्यातून एकदा आयोजित करावे अशी विंनती विविध प्राधिकरण सदस्यांनी वेळोवेळी मा. कुलगुरु महोदयांकडे केलेली होती. मा. कुलगुरु महोदयांनी उपरोक्त विनंतीचा विचार करता दरवर्षातून तीन वेळेस सदरहू शिबीर आयोजन करण्यासाठी सहमती दर्शविलेली आहे. प्राप्त आदेशान्वये शिबिराचे वार्षिक वेळापत्रक खालील प्रमाणे असेल.

## CAS- Academic Level 10 to 11 and 11 to 12 शिबिर आयोजनाचे वार्षिक वेळापत्रक

| क्र. | कालावधी | महाविद्यालयांकडे प्रस्ताव स्विकारण्याचा कालावधी | प्रस्ताव दाखल करण्यासाठी पदोन्नतीसाठी पात्र दिनांक | प्रत्यक्ष शिबिर आयोजन करण्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| ०१ | जानेवारी ते एप्रिल | १ जानेवारी ते १५ एप्रिल पर्यंत | १५ एप्रिल पर्यंत | एप्रिल महिन्याच्या शेवटच्या आठवडयात |
| ०२ | मे ते ऑगस्ट | १ मे ते १५ ऑगस्ट पर्यंत | १५ ऑगस्ट पर्यंत | ऑगस्ट महिन्याच्या शेवटच्या आठवडयात |
| ०३ | सप्टेंबर ते डिसेंबर | १ सप्टेंबर ते १५ डिसेबर पर्यंत | १५ डिसेबर पर्यंत | डिसेबर महिन्याच्या शेवटच्या आठवडयात |

... २

उपरोक्त वेळापत्रक हे दरवर्षी निर्धारित केल्याप्रमाणे असेल. तथापि, स्टेज एक मधून स्टेज दोन मध्ये व स्टेज तीन मध्ये (Academic Level १० ते ११ आणि ११ ते १२) कॅस प्रकरणे तपासणीसाठी आयोजक महाविद्यालय म्हणून इच्छूक महाविद्यालयांनी दरवर्षी सहमती कळविणे आवश्यक राहील.

- **सन २०२५ या वर्षासाठी आयोजक महाविद्यालय म्हणून महाविद्यालयांकडून सहमती पाठविणे :**

उपरोक्त वार्षिक वेळापत्रकाप्रमाणे सन २०२५ या वर्षासाठी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्न सर्व अनुदानित कला, विज्ञान, वाणिज्य, विधी, शिक्षणशास्त्र, समाजकार्य महाविद्यालयातील उन्नत अभिवृद्धी योजनेतर्गत (CAS) पदोन्नतीसाठी स्टेज एक मधून स्टेज दोन मध्ये व स्टेज तीन मध्ये (Academic Level १० ते ११ आणि ११ ते १२) जाण्याकरीता पात्र अध्यापकांच्या प्रस्तावांची छानना तथा मूल्यमापनासाठी जळगाव,धुळे आणि नंदूरबार जिल्हानिहाय आयोजक महाविद्यालय म्हणून काम करण्यास सहमती मागविण्यात येत आहे.

१. सन २०२५ या वर्षासाठी वार्षिक शिबीर आयोजन करण्यासंदर्भात आयोजक महाविद्यालय म्हणून विद्यापीठाकडे दि. ३० डिसेंबर, २०२४ पर्यंत सहमती कळवावी.

२. सन २०२५ या वर्षासाठी आयोजक महाविद्यालय म्हणून प्राप्त प्रस्तावातून जळगाव, धुळे आणि नंदूरबार जिल्हानिहाय प्रती जिल्हा आयोजक एक-एक महाविद्यालय निश्चित करण्यात येईल. तसे स्वतंत्ररित्या कळविण्यात येईल.

३. नंदूरबार जिल्ह्यासाठी प्राप्त प्रस्तावांची संख्या कमी असल्यास सदरहू महाविद्यालये धुळे जिल्ह्याकडे तपासणीसाठी वर्ग करण्याचा अधिकार विद्यापीठाने राखून ठेवलेला आहे, परिस्थितीनुसार त्यात बदल करण्यात येईल.

४. आयोजक महाविद्यालय निवड झालेल्या महाविद्यालयाना सन २०२५ या एका वर्षातील तीन शिबिर घेता येईल. सदर आयोजक महाविद्यालय सन २०२५ या वर्षातील तीनही टप्यांची संपूर्ण प्रक्रिया राबविणे आवश्यक राहील.

५. शिबिर आयोजनासंदर्भात आवश्यक त्या सुविधा उदा. आवश्यक कक्ष, पिण्याचे पाणी, प्रसाधन गृहे, आवश्यक मनुष्यबळ, दळणवळणाच्या सुविधा, आयोजनासंदर्भातील संपूर्ण जबाबदारी आदिंचा विचार सहमती देते वेळी आयोजक महाविद्यालयांकडून करण्यात येणे आवश्यक आहे.

तरी प्राचार्यांनी उपरोक्त परिपत्रक सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावे. तसेच सन २०२५ साठी आयोजक महाविद्यालय म्हणून दि. ३० डिसेंबर, २०२४ पर्यंत विद्यापीठास सहमती कळवावी ही विनंती.

आपला विश्वासू

उपकुलसचिव
(व्याख्याता मान्यता विभाग)

**प्रत माहितीस्तव:**

1) मा. कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि,जळगाव
2) मा. प्र-कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि,जळगाव
3) मा. कुलसचिव महोदय, कबचौउमवि,जळगाव
4) मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, जळगाव विभाग, जळगाव